**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे १**
Web:www.jdhepune.info
E_mail - jdhepune@gmail.com
फोन नं.020-26127833/26051632
फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र.ससं/उशि/पुवि/वा.प्रे.दि./अहवाल/2017/2306 दि.04/10/2017

**वाचन प्रेरणा दिन**

प्रति,
1.कुलचिव,सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठ, पुणे
2.कुलचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, पुणे
3.कुलचिव, टिळक विद्यापीठ, पुणे
4.कुलचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
5.प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य,विज्ञान,विधी, शिक्षणशास्त्र व
शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे / अहमदनगर /नाशिक.

**विषय** — माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक 15 ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत...

संदर्भ — 1) शासन परिपत्रक, मराठी भाषा विभाग, क्र.वाप्रेदि-2017/प्र.क्र.93/2017/ भाषा-3,दि.03/10/2017.
2) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र क्षणविभाग, क्र.बैठक-2413/प्र.क्र.140/15)/समन्वय, दि.09/10/2015.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक 15 ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने यापूर्वी शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे या वर्षी सुध्दा वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांनी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत सूचना देण्यात येत आहे.

(1) **दिनांक 15 ऑक्टोबर, रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दिनांक 13 ऑक्टोबर, 2017 रोजी आपण कार्यक्रमांचे आयोजन करावे.** प्रत्येक अधिकारी / कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी, शिक्षक वर्ग



Scanned by CamScanner

आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कामकाजाच्या वेळेत किमान अर्धा तास वाचनासाठी द्यावा. वाचनाकरीता समूहाने एकत्रित बसून, आपला वेळ वाचनासाठी व्यतीत करावा.

(2) वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट द्यावे.

(3) WhatsApp, Internet, Facebook, Twitter अशा सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल / वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

(4) चालू वर्ष हे ख्यातनाम कवी विंदा करंदीकर यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे. त्या अनुषंगाने कवी संमेलन / व्याख्यान / भाषण / चर्चासत्र / सामुहिक वाचन / अभिवाचन / अनुभव कथन / ग्रंथप्रदर्शन / विविध स्पर्धा इत्यादी पैकी सुयोग्य उपक्रम राबवावेत.

(5) विविध क्षेत्रातील सुप्रसिध्द व्यक्ती, साहित्यिक संस्था, सार्वजनिक ग्रंथालये यांचे सहकार्य घेऊन सामुदायिकरित्या पुस्तक वाचनाचे कार्यक्रम आयोजित करावे.

(6) "पुस्तकांचे गांव" (भिलार, ता. महाबळेश्वर,जि.सातारा) या शासनाच्या अभिनव प्रकल्पाची माहिती घेण्यात यावी. शक्य असल्यास या प्रकल्पास भेट द्यावी.

सोबत वाचन प्रेरणा दिन- उपक्रम सूची जोडण्यात येत आहे. या उपक्रमाशिवाय वाचन प्रेरणा दिनाशी सुसंगत नव उपक्रम राबविण्यात यावा.

शासन निर्देशाप्रमाणे आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रासह अहवाल vinodtawdewpd2017@gmail.com **या ई-पत्यावर तसेच या कार्यालयाच्या admin@jdhepune.info या ई-पत्त्यावर पाठविण्याची दक्षता घ्यावी.**

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत:- वरीलप्रमाणे.





Scanned by CamScanner

(या कार्यालयाकडील क्र.ससं/उशि/पुवि/वा.प्रे.दि./अहवाल/2017 2306/04 दि.03/10/2017 चे सहपत्र)

## स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन - दि. १५ ऑक्टोबर
## वाचन प्रेरणा दिन — उपक्रम सूची

१. वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर व्याख्यान.

२. वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळा.

३. लेखकांशी त्यांच्या लेखनाविषयी, त्यांच्या कलाकृतींविषयी चर्चा किंवा त्यांची प्रकट मुलाखत.

४. **भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव (भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा)** या उपक्रमाची माहिती विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांना देणे किंवा निवडक विद्यार्थ्यांना घेऊन अभ्यास सहलीचे आयोजन करणे.

५. हे वर्ष कविवर्य **विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दी वर्ष** असल्याने विंदांच्या साहित्यावर समर्पक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

६. सुसंगत स्पर्धा (निबंध स्पर्धा किंवा काव्यवाचन स्पर्धा किंवा अभिवाचन स्पर्धा... इत्यादी).

७. विद्यार्थ्यांनी किंवा वाचकांनी आवडत्या पुस्तकाविषयी आणि लेखकाविषयी लेखी किंवा तोंडी मनोगत व्यक्त करणे.

८. वाचन कौशल्याचा विकास या विषयावरील प्रशिक्षण व सादरीकरण.

९. वृत्तपत्रांतील अग्रलेख / प्रमुख लेखांचे वाचन.

१०. ई- बुक्सचे सामूहिक वाचन.

११. निवडक कथा, कविता आणि उतारे यांचे अभिवाचन.

१२. एखाद्या सुप्रसिद्ध पुस्तकातील महत्त्वाच्या / निवडक पानांचे सामूहिक वाचन (पारायण).

१३. प्रकाशक / वितरक / ग्रंथालये यांच्या सहकार्याने पुस्तकांचे प्रदर्शन.

१४. **संकल्प** — महिन्यातील एक दिवस **‘ नो गॅजेट डे’** म्हणून कृतीत आणण्याचे आवाहन.
(‘ नो गॅजेट डे’- मोबाईल, व्हॉटस्अ‍ॅप, फेसबुक, ट्विटर न वापरता तो वेळ वाचनासाठी देणे.)

१५. सलग काही वेळ (शांतपणे, एकट्याने) वाचनाचा उपक्रम (विद्यार्थी / वाचक एखाद्या वर्गात / सभागृहात बसून एकट्याने पुस्तक वाचतील.)

१६. वाढदिवशी एकमेकांना पुस्तक भेट देण्याचे आवाहन.

१७. वाचन प्रेरणा दिनाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी / नागरिकांनी एकमेकांना पुस्तक भेट द्यावे.

१८. शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात **‘डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम वाचन कट्टा’** निर्माण करावा.

१९. **पुष्पगुच्छ नाही पुस्तक** (बुके नाही बुक) - सार्वजनिक कार्यक्रमांत पाहुण्यांना पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व प्रसार.

२०. वाचन प्रेरणा दिनाच्या बोधचिन्हाचा (लोगोचा) सोशल मीडियाद्वारे आणि रंगीत छापील प्रती काढून प्रसार.

**टीप :** आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल **vinodtawdewpd2017@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.





Scanned by CamScanner